तरुण भारत संवाद
शुक्रवार, ९ ऑगस्ट २०२४
कोल्हापूर दिनांक पान ४

# गुणवत्तेसाठी शिक्षकांनी दक्ष राहणे आवश्यक

## राज्य उच्च व तंत्र शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखेंना स्मृतिदिनी अभिवादन

**प्रतिनिधी**

कोल्हापूर

सध्याच्या पालकांना गुणवत्ता, दर्जात्मक पद्धतीचे शिक्षण हवे आहे. त्यामुळे खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी रांगा लागत असताना शासकीय अनुदानित विद्यापीठांना विद्यार्थी मिळत नसल्याचे चित्र आहे. स्पर्धेच्या युगात ही परिस्थिती आणखी वाढत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे शिक्षण संस्था, शिक्षकांनी काळानुसार स्वत:मध्ये बदल करून दक्ष राहण्याची गरज आहे, असे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी केले. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३७ व्या स्मृतिदिनी गुरूवारी त्यांना संस्थेच्या प्रांगणात अभिवादन करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात 'विकसित भारत व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' यावर डॉ. शैलेंद्र देवळाणकर प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. संस्था कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. देवळाणकर म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. महाराष्ट्राने पद्धतशीरपणे हे धोरण दोन टप्प्यात राबवल्याने देशभर महाराष्ट्र रोल मॉडेल ठरत आहे. नवीन शैक्षणिक धोरणाची देशाला विकसित भारताकडे घेऊन जाण्यास मदत होणार आहे. जगभरातील अनेक देशांमध्ये आपले विद्यार्थी शिक्षण घेऊन शुल्कातून त्यांचा जीडीपी वाढवत आहेत. हे विद्यार्थी का बाहेर जात आहेत, याचा विचार करणे गरजेचे आहे. शिक्षकांना अस्तित्व टिकवण्यासाठी आता बदलावे लागेल, असे त्यांनी स्पष्ट केले.



कोल्हापूर : शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या स्मृतिदिनी गुरूवारी आयोजित कार्यक्रमात बोलताना उच्च व तंत्र शिक्षण संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर. सोबत कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, मुख्य कार्यकारी अध्यक्ष कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे आदी.

कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, विवेकानंद शिक्षण संस्थेच्या स्थापनेपासून यशाची घोडदौड कायम आहे. ज्ञान व विज्ञानाचा विचार देत बापूजींनी अनेक शिक्षक कार्यकर्ते घडवले. विज्ञान आणि अध्यात्म यांना त्यांनी एकसंधपणे पुढे नेले. त्यांच्या विचाराचे आचरण करत प्राध्यापकांनी काम करावे. आपल्या संस्थेचा विद्यार्थी आंतरराष्ट्रीय पातळीवर नेण्यासाठी प्रत्येकांने प्रयत्न करावेत, असे आवाहन त्यांनी केले.

### 'विवेकानंद'ने विद्यापीठाकडे वाटचाल करावी

विवेकानंद शिक्षण संस्थेने विद्यापीठाकडे वाटचाल करावी, स्वामी विवेकानंद संस्था ही राज्यातील नामांकित शिक्षण संस्था आहे. या संस्थेची तीन समूह विद्यापीठे होऊ शकतात. त्यांच्यात ती क्षमता आहे. त्यामुळे या संस्थेने स्वायत्तमध्ये न अडकता आता स्वतंत्र विद्यापीठाकडे वाटचाल करावी. त्यासाठी लागेल ती मदत करु, अशी ग्वाही डॉ. देवळाणकर यांनी दिली.

शिक्षण संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी प्रास्ताविक केले. विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. प्रा. सुप्रिया पाटील, प्रा. समीक्षा फराकटे यांनी सुत्रसंचालन केले. संस्थेतील गुणवंत विद्यार्थी सुखदेव पाटील यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे सहसचिव (अर्थ) सिताराम गवळी यांनी आभार मानले. यावेळी संस्थेचे कोल्हापूर विभागप्रमुख श्रीराम साळुंखे, संस्थेचे आजी, माजी पदाधिकारी, विविध शाखाप्रमुख, शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

लोकमत
शुक्रवार ९.८.२०२३

# शिक्षकांनो, गुणवत्तेसाठी नेहमी सैनिकांसारखे दक्ष राहा

## डॉ. शैलेंद्र देवळाणकर : बापूजी साळुंखे स्मृतिदिनानिमित्त व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : सध्याच्या पालकांना गुणवत्ता, दर्जात्मक पद्धतीचे शिक्षण हवे आहे. त्यामुळे खासगी विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी रांगा लागत असताना शासकीय अनुदानित विद्यापीठांना विद्यार्थी मिळत नसल्याचे चित्र आहे. त्यामुळे शिक्षण संस्था, शिक्षकांनी काळानुसार बदलत सीमेवरील सैनिकांसारखे नेहमी दक्ष राहून गुणवत्ता टिकवावी, अन्यथा जे बदलणार नाहीत त्यांना विद्यार्थी मिळणे मुश्कील होईल, अशी भीती राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे संचालक डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी गुरुवारी व्यक्त केली.

स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे संस्थापक बापूजी साळुंखे यांच्या ३७ व्या स्मृतिदिनानिमित्त डॉ. देवळाणकर यांचे 'विकसित भारत व राष्ट्रीय शैक्षणिक धोरण' या विषयावर व्याख्यान झाले. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अभयकुमार साळुंखे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. देवळाणकर म्हणाले, जगभरातील अनेक देशांमध्ये आपले विद्यार्थी शिक्षण घेऊन शुल्काच्या माध्यमातून त्यांचा जीडीपी वाढवत आहेत. हे विद्यार्थी का बाहेर जात आहेत याचा विचार करणे गरजेचे असून, अस्तित्व टिकवण्यासाठी आता प्रत्येकाला बदलावे लागेल.

यावेळी डॉ. अभयकुमार साळुंखे यांनी विवेकांनद शिक्षण संस्थेच्या स्थापनेपासूनचा प्रवास उलगडला. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे यांनी प्रास्ताविक केले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांनी परिचय करून दिला. संस्थेच्या कला शिक्षकांच्या कलाकृतीचे प्रदर्शन मान्यवरांच्या हस्ते झाले. गुणवंत विद्यार्थ्यांना बक्षीस देऊन गौरविले. यावेळी उच्च व तंत्र शिक्षण कोल्हापूर विभागीय सहसंचालक अशोक उबाळे, श्रीराम साळुंखे, आदी उपस्थित होते.



कोल्हापुरात गुरुवारी आयोजित व्याख्यानात डॉ. शैलेंद्र देवळाणकर यांनी मार्गदर्शन केले. यावेळी आर. आर. कुंभार, डॉ. अभयकुमार साळुंखे, श्रीराम साळुंखे, कौस्तुभ गावडे उपस्थित होते.

### 'विवेकानंद'ने विद्यापीठाकडे वाटचाल करावी

स्वामी विवेकांनद संस्था ही राज्यातील नामांकित संस्था आहे. या संस्थेची तीन समूह विद्यापीठे होऊ शकतात. त्यांच्यात ती क्षमता आहे. त्यामुळे या संस्थेने स्वायत्तमध्ये न अडकता आता स्वतंत्र विद्यापीठाकडे वाटचाल करावी. त्यासाठी लागेल ती मदत करू, अशी ग्वाही डॉ. देवळाणकर यांनी दिली.

09/08/24
9.8.24